दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३४२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.८ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ओबीसी आरक्षणाचे विधेयक अधिवेशनात मंजूर

## सहा महिने निवडणुका पुढे ढकलण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ओबीसी आरक्षणाचं विधेयक आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात मांडण्यात आले. त्यानंतर सभागृहात एकमताने हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. आता निवडणूक वगळता सर्व अधिकार राज्यसरकारने स्वतःकडे घेतले आहे. मध्य प्रदेश पॅटर्नप्रमाणे, राज्यात ओबीसी आरक्षणाचं विधेयक मंजूर झालं आहे.

निवडणूक आयोग निवडणुकीच्या तारखांसंदर्भात राज्य सरकारसोबत सल्लामसलत करूनच निर्णय घेईल, अशी सुधारणा विधेयकात करण्यात आली आहे. सुधारणा विधेयक आमदार सुनील प्रभू यांनी अधिवेशनात मांडलं. मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र नगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी सुधारणा विधेयक सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आलं आहे.



ओबीसी आरक्षणाचं विधेयक विधानसभेत मंजूर झाल्याने सहा महिने दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सहा महिने निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात. सर्व पक्षीय बैठकीत ओबीसी राजकीय आरक्षणाबाबत निर्णय घेण्यात आला. या विधेयकानुसार वॉर्ड रचना, प्रभाग रचना आणि निवडणूक आयोगाच्या सहमतीने चर्चा करून सरकार निवडणुकीची तारीख सुचवेल. विधेयकामुळे सरकारला प्रभाग रचनेसाठी सहा महिने मिळणार आहेत. त्या काळात सरकार इम्पिरिकल डेटा गोळा करु शकणार आहे.

मध्यप्रदेशमध्ये ओबीसीच्या आरक्षणासंदर्भात ट्रिपल टेस्टची अडचण आली. ट्रिपल टेस्ट शिवाय आरक्षण देता येणार नाही हा निकाल सर्व देशाला लागू झाला. त्यामुळे महाराष्ट्रात ओबीसीशिवाय काही ठिकाणी निवडणूक झाली. मध्यप्रदेश, ओरिसा, कर्नाटकालाही तोच कायदा लागू झाला. त्यावेळी मध्यप्रदेशने अध्यादेश काढला. निवडणूक आयोगाचे काही अधिकार स्वत:कडे घेतले. प्रभागरचना करणे, कुठे आरक्षण देता येईल ते ठरवणे आदी अधिकार मध्यप्रदेशाने स्वत:कडे घेतले. निवडणूक आयोगाकडे केवळ निवडणूक घेण्याचे अधिकार ठेवले. त्यामुळे त्यांना वेळ मिळाला.

विनापरवाना सिडकोच्या ५७ एकर जागेत व्यवसाय करून

# करोडो रुपयांचा कर बुडविल्या प्रकरणी आयओटीएल कंपनी विरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील व द्रोणागिरी नोड मौजे नवघर येथे सेक्टर १०१ मध्ये सिडको च्या मालकीच्या ५७ एकर जमीनी मध्ये सुमारे सन १९९८ पासून इंडियन ऑइल टँकिंग लिमिटेड (आय ओ टी एल) ही कंपनी सिडको कडून भोगवटा प्रमाणपत्र व इतर आवश्यक त्या परवानग्या न घेता विना परवाना व्यवसाय करीत आहे.

त्या बाबत राम दशरथ पाटील रांजणपाडा ग्रामपंचायत धुतुम, ग्रामपंचायत सदस्य जासई व ग्रामस्थ रांजणपाडा यांनी संबंधित कंपनी विरोधात तक्रारी केल्या नंतर त्याची दखल सिडको कार्यालया कडून घेण्यात येऊन वरील आय ओ टी एल कंपनीची चौकशी सिडको मार्फत करण्यात आली असता सुमारे सन १९९८ पासून सदरची आय ओ टी एल कंपनी वरील ठिकाणी सिडको च्या मालकीच्या जमिनीमध्ये सिडको कडील प्रमाण पत्र न घेता विना परवाना व्यवसाय करीत असल्याचे व कंपनीने आज पर्यंत करोडो रुपयांचा सिडको चा कर बुडविल्या चे सिद्ध झाले आहे.

सिडको मार्फत आय ओ टी एल कंपनी विरोधात कार्यवाई चालू करण्यात आलेली आहे, म्हणून आज पर्यंत कोणते ही शासकीय नियम न पाळता व शासकीय कार्यालयां स न जुमानता बिनधास्त पणे व्यवसाय करणाऱ्या आय ओ टी एल कंपनीने त्यांच्या विना परवाना चालू असलेल्या व्यवसाया सिडको कडून परवानगी मिळावी म्हणून सिडको कडे अर्ज केलेले आहेत आणि अधिकाऱ्यांची मनधरणी करून व राजकीय दबाव टाकत परवानगी मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न चालविलेला आहे.

मात्र आय ओ टी एल कंपनीच्या आज पर्यंतच्या उद्धटपणे व नियम बाह्य वागण्याची दखल घेत प्रथम २ कोटी ७५,८३,४०४ रुपये इतकी सर्व्हिस चार्ज ची थकबाकी ची रक्कम भरा मग तुमच्या अर्जा चा विचार .../२

# बोगस खेळाडू प्रमाणपत्र आधारे नियुक्त्यांवर आळा घालण्यासाठी सॉफ्टवेअर निर्मिती करणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

वर्ग ३ आणि वर्ग ४ या पदांकरिता ३४ खेळाडूंची नियुक्ती करण्यात आली होती. यापैकी १२ जणांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असून उवर्रित २२ जणांच्या नियुक्त्या लवकरच रद्द करण्यात येणार असून भविष्यात अशा बोगस खेळाडू प्रमाणपत्राच्या आधारे भरती होऊ नये यासाठी क्रिडा विभागामार्फत एक आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसित केली जाईल, अशी माहिती क्रीडा राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत दिली.



शासन सेवेत ज्या २५८ कर्मचाऱ्यांनी बोगस प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्ती मिळवली, त्यांच्यावर पोलीस कार्यवाही करण्यात आली विभागामार्फत त्यांच्यावर एफ. आय.आर. दाखल करण्यात आला आहे. याबाबतची पूर्तता बैठक लवकरच घेण्यात येणार असल्याचे राज्यमंत्री तटकरे यांनी सांगितले. विधान परिषद सदस्य श्रीमती मनिषा कायंदे, सदानंद खोत यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता.

# तळोजा एमआयडीसी मधील रासायनिक कंपनीला आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील तळोजा औद्योगिक वसाहत मधील रासायनिक कंपनीला मध्य रात्रीच्या सुमारास लागलेल्या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाले असे तरीही सुदैवाने कोणतीही जीवित हानी जाही नाही आहे.

तळोजा औद्योगिक वसाहती मधील प्लॉट नं १७/२२ मॉर्सन केमिकल कंपनीमध्ये मध्य रात्रीच्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच तळोजा पोलीस ठाण्याचे पथक तसेच अग्नीशमन दलाचे पथक घटना स्थळी रवाना झाले व त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून पहाटे चारच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवले, आगीमध्ये कुठल्याही प्रकराची जीवित हानी नाही झाली. सादर आग हि शॉर्टसर्किट मुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.




# खारेपाट भागात अशुद्ध व गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा


## आ. प्रशांत ठाकूर यांचा विधिमंडळ अधिवेशनात तारांकित प्रश्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेण तालुक्यातील खारेपाट भागात शहापाडा धरणातील अशुद्ध व गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले.

खारेपाट भागात कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करूनही शहापाडा धरणातून अशुद्ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या धरणावर बसविण्यात आलेले जलशुध्दीकरण संयंत्र कित्येक वर्ष बंद असल्यामुळे लाखो रूपये खर्च करूनसुद्धा विभागातील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी मिळत नाही. या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,





चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहापाडा धरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन येथील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी पुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळ अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे पाणी पुरवठा व स्वछता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, खारेपाट भागात कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करूनही शहापाडा धरणातून अशुद्ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याची बाब अंशतः खरी आहे. धरणातील पाणी साठा संपल्यामुळे अशुध्द व गढूळ पाणी पुरवठा झाला होता. त्यामुळे सदरचा पाणी पुरवठा त्वरीत बंद करण्यात आला. मात्र, सद्यस्थितीत सिडकोकडून पाणी उपलब्ध करून शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

## संक्षिप्त...

### दरेकर आणि धस यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँकेत गैरव्यवहार प्रकरणी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आणि भाजपचे विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश राज्य सहकार खात्यातर्फे देण्यात आले आहेत. मुंबै बँकेचे अध्यक्ष असताना प्रवीण दरेकर यांनी भाजप आमदार सुरेश धस आणि त्यांच्या पत्नीला बनावट दस्तावेजांच्या आधारे २७ कोटी रुपयांचे कर्ज बेकायदेशीररित्या वाटप केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुंबै बँकेचे माजी अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सुरेश धस यांना बोगस दस्तावेजांच्या आधारे तब्बल २७ कोटींचे कर्ज वाटप केल्याचा आरोप आहे. बीडचे आमदार सुरेश धस यांच्या जयदत्त ॲग्रो इंडस्ट्रीज, अंभोरा आणि मच्छिंद्रनाथ ओव्हरसीज प्रा. लि. आष्टी या कागदोपत्री उद्योगांना हे कर्जवाटप करण्यात आले होते, त्यासाठी बोगस कागदपत्र तयार करण्यात आले, असा आरोप करण्यात आला आहे. मुंबै बँकेच्या या प्रकरणात आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बीड हे मुंबै बँकेच्या कार्यक्षेत्राबाहेर असल्याने, येथेही नियमभंग झाल्याचे म्हटले आहे.

# पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्वाचे : आ.प्रशांत ठाकूर

## महिला दिनाचे औचित्य साधून केदार भगत मित्र परिवाराकडून हळदी कुंकू आणि महिलांचा सन्मान





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्वाचे असून त्यांचा आदर्श घेऊन महिलांनी कार्यरत राहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केले. पनवेलमधील केदार भगत मित्र परिवाराच्यावतीने महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित हळदी कुंकू आणि २१ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान तसेच चला खेळूया पैठणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, माजी नगरसेविका नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, सुहासिनी केकाणे, नीता मंजुळे, लीना पाटील, दत्ता केंद्रे, नंदकुमार धोत्रे, आयोजक केदार भगत आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, महिला आणि पुरुष एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महिला या त्यागमूर्ती असल्याने त्यांना नक्कीच मान सन्मान झाला पाहिजे, त्यांचा सन्मान .../२

### सुनेने मानले व्यासपीठावरून पतीला किडनी दान केलेल्या सासूचे जाहीर आभार

नवीन पनवेलमधील शशिकांत लोखंडे यांची किडनी निकामी झाली असताना त्यांच्या आईने म्हणजेच बेबीताई चंद्रकांत लोखंडे यांनी त्यांना स्वतःची किडनी दान केली. केदार भगत मित्र परिवाराकडून त्यांचा जाहीर सन्मान केला. यावेळी त्यांच्या सून स्नेहा शशिकांत लोखंडे यांना कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी स्नेहा लोखंडे यांनी आपल्या सासूचे जाहीर आभार मानले. त्या यावेळी म्हणाल्या की , सासूनी मला माझं फक्त सौभाग्यच नाही तर तर सर्वस्वच परत दिले त्यामुळे त्यांचे आभार या व्यासपीठावरून जाहीर पणे मानत आहे. त्यांनी केदार भगत यांना हे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याने त्यांचे देखील आभार व्यक्त केले.

# जागतिक महिला दिन पनवेलमध्ये अनोख्या पद्धतीने साजरा

## जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेची महिलांना नाट्य मेजवानी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या ममताताई प्रीतम म्हात्रे यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात हजारो महिलांनी सहभाग घेतला.

याप्रसंगी बोलताना सौ ममताताई प्रीतम म्हात्रे म्हणाल्या, जागतिक महिला दिनानिमित्त सर्व घटकांतील महिलांना सोबत घेऊन सर्वसमावेशक कार्यक्रम करण्याचे आमच्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या महिला पदाधिकार्यांनी ठरविले होते. स्वतःसाठी काही क्षण मनोरंजनाचे या वाक्यानुसार आम्ही आज महिलांच्या तीन पिढ्या म्हणजेच आज्जी, आई आणि मुलगी यांच्या मधील रोज घडणाऱ्या काही घटना ज्या महिला ज्येष्ठ कलाकार वंदना गुप्ते, प्रतीक्षा लोणकर, दीप्ती लेले यांनी हरवलेल्या पत्त्यांचा बंगला यात नाट्य स्वरूपात मांडलेल्या नाटकाच्या प्रयोगाचे आम्ही आयोजन केले होते. महिलांचा प्रतिसाद पाहून आसन व्यवस्था अपुरी पडत .../२

# मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्यावर भर : ना.अशोक चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई–गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला गती देण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करीत असून कंत्राटदार बदलणे, भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावणे अशा विविध स्तरावर काम करीत आहे. या महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्यावर भर दिला असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री अशोक चव्हाण यांनी विधान परिषदेत दिली.



विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी मुंबई–गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना चव्हाण बोलत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण म्हणाले, मुंबई–गोवा महामार्गावरील .../२

# लैंगिक समानता आवश्यक

सर्व क्षेत्रात महिलांनी आपली छाप पाडलेली आहे. जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी साजरा करण्यात येतो. महिलांच्या हक्कांचे रक्षण, स्त्री सन्मानतेच्या दृष्टीने जागतिक महिला दिन साजरा केला जातो. महिलांच्या हक्कांचे रक्षण आणि स्त्री-पुरुष समानता या दृष्टीने जागतिक महिला दिनाला विशेष महत्त्व आहे. सन २०२२ च्या महिला दिनाची थीम 'सस्टेनेबल उद्यासाठी: लैंगिक समानता' (Gender Equality Today for a Sustainable Tomorrow) अशी आहे.

स्त्री हा समाजाचा मूलभूत घटक... नवी पिढी घडवणारा, कुटुंबव्यवस्थेला आकार देणारा, घरा-घरात सुसंवाद राखणारा... समाजात स्त्रीचं स्थान जितकं महत्त्वाचं, आदराचं, तितका तो समाज सभ्य, सुसंस्कृत... मुलगी, बहीण, मैत्रीण, आई, पत्नी वा अन्य जिव्हाळ्याची नाती... स्त्रीमुळे नातेसंबंधात एक वेगळीच मृदुता, जिव्हाळा, माया, प्रेम उत्पन्न होतं... पुरुषाशिवाय महिला समर्थपणे आणि वेळ पडलीच तर त्याच्यापेक्षा उत्तमरितीनं कुटुंबाचा गाडा हाकतांना दिसतात.

प्रत्येक महान व्यक्तींच्या जीवनात आणि यशात स्त्रियांचा सिंहाचा वाटा असतो असे म्हटले जाते. आज पुरुषांबरोबर स्त्रियादेखील सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत आहेत, परंतु आजही स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना घडत असतात. लैंगिक शोषण, अत्याचार, हुंडाबळी, भृणहत्या या गोष्टींमुळे स्त्रियांच्या मुलींच्या मनात भीतीची, असुरक्षिततेची भावना निर्माण होते. यासाठी शासन विविध प्रयत्न करीत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातही महिला पुढे होत्या आणि स्वातंत्र्यानंतरही अनेक क्षेत्रात महिला पुढे आहेत. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सानिया मिर्झा, कल्पना चावला, इंदिरा गांधी, सुनीता विल्यम्स या सर्वांनी प्रगतीची दारे फक्त स्त्रियांसाठीच म्हणून नाही तर देशासाठी- कीर्तीची, नावलौकिकाची खुली केली.

महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच महिला धोरण आणले आहे. आता नव्याने महिला धोरणाच्या माध्यमातून अनेक नव्या गोष्टी केल्या जाणार आहेत. शासनाच्या माहितीसाठी अनेक योजना आहेत. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या विकासासाठी राज्याने पहिले महिला धोरण सन १९९४ मध्ये जाहीर केले. महिला धोरण आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रत्येक जिल्हयामध्ये महिला व बाल सशक्तीकरण या सर्वसमावेशक योजनेकरिता (Umbrella Scheme) जिल्हा नियोजन समितीस नियोजन विभागाकडून मिळणाऱ्या एकूण निधीच्या किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी महिला व बालविकास विभागाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला बचत गटांना अधिक सक्षम करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कारागृहात बंदी असलेल्या महिलांना कायदेशीर मदत करून त्यांना कारागृहातून सोडवणुकीसाठी कोर्टामध्ये सहकार्य करणे व त्यांचे समुपदेशन करणे याकरिता महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण संचालक, महाराष्ट्र अभिवक्ता संचालक, जेल प्रिझम यांच्या समवेत महिलांच्या कायदेशीर सहकार्याकरिता राज्य महिला आयोगाच्या वतीने 'मिशन मुक्ता' ही मोहीम राबविण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी नवतेजस्विनी अंतर्गत महिला बचत गटांना ५२३ कोटींचा निधी दिला आहे.सर्वांगीन प्रगती साधण्यासाठी महिला आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे.त्यामुळे नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम राज्यातील पीडित महिलांना आपल्या तक्रारी इत्यादी प्रकरणात जलद न्याय मिळणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.राज्यभरातील महिलांना आपल्या तक्रारी घेऊन मुंबईला येणे सोयीचे नाही, हे लक्षात घेऊन राज्य महिला आयोगाची कार्यालये सर्व विभागीय आयुक्तालयांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी सुरू करण्यात आली आहेत. एकूणच सर्व क्षेत्रात सामुहिक विकास करायचा असेल तर स्त्री-पुरुष भेद ठेवून चालणार नाही. यासाठी लैंगिक समानतेवर आधारित विकासाचे सुत्र महत्वाचे असणार आहे.

**वनिता कांबळे**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, नवी मुंबई**

# गाव विकासासाठी केलेला पक्ष प्रवेश व्यर्थ जाणार नाही : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गाव पंचक्रोशीचा सर्वांगीण विकासासाठी बनोटी, रेवळी आणि गणेशनगर मधील सर्व ग्रामस्थ, महिला मंडळ, ग्रुप ग्राम पंचायत सरपंच अनंत कांबळे, उपसरपंच लोमेश नात्की, जयदास कांबळे, रामजी टिंगरे, गाव अध्यक्ष महादेव गाणेकर यांचे सह ग्राम पंचायत तिच्या सर्व सदस्यांनी आणि गाव प्रमुखांनी भाजप मधुन राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये खासदार सुनिल तटकरे यांचे प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी खासदार तटकरे यांनी स्वागत कार्यक्रमात संबोधित करताना आपण आता आमच्यावर विश्वास ठेवा विकास कामांसाठी निधीची कमतरता पडणार नाही पक्षात प्रवेश करून आम्हाला आपला विकास करण्यासाठी एक प्रकारे आत्मिक बळ दिले असल्याचे मनोगत खासदार सुनिल तटकरे यांनी मौजे बनोटी येथे पक्ष प्रवेश आणि गाव अंतर्गत रस्ते विकास कामाचे भूमीपूजन कार्यक्रमाला व्यक्त करताना सांगितले. महिला दिनाचे पुर्व संधेला माजी सरपंच मीना टिंगरे, अनिल टिंगरे, आणि माजी सभापती यांनी समाजातील गाववाडीचा विकासाची पडलेली ठिगळ भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आहे आता हा ठिगळ भरून काढण्यासाठी आमचे यशस्वी प्रयत्न राहतील. जशी साथ लोकसभेत खासदार निवडुन आणण्यासाठी मला केलीत त्या पेक्षा जास्त मताधिक्याने राज्य मंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांना निवडुन दिलेत तशीच कृपा येणाऱ्या पंचयत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांचे पाठीशी खंबीरपणे उभी करा असे आवाहन खासदार सुनिल तटकरे यांनी तीनवाडी ग्रामस्थांना केले.

पक्ष प्रवेश आणि विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रमाला खासदार तटकरे यांचे समावेत तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, पंचायत समिती सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती महादेव पाटील, युवक अध्यक्ष फैसल गीते, सरपंच अनिल बसवत, संतोष नाना सावंत, रियाजभाई फकिह, गजानन पाखड, गाव अध्यक्ष गणपत गाणेकर, प्रकाश गाणेकर, महिला अध्यक्षा रेश्मा काणसे, मीना टिंगरे, अनिल टिंगरे, लहूशेट म्हात्रे, मनोज नात्की, तुकाराम पाटील, प्रकाश कोठावले आदि मान्यवर उपस्थित होते.

माजी सरपंच मीना टिंगरे यांनी गावातील विकास आदरणीय खासदार सुनिल तटकरे करू शकतात हा विश्वास असल्याने आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला असल्याचे सांगितले. खासदार तटकरे यांनी शब्द देताच तिन्ही गावात विकास कामांना मंजुरी मिळाली असल्याचे सांगितले.

# कॉंग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण व सत्कार समारंभ उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या मान्यतेने व रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी रायगड जिल्हा कॉंग्रेसची नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. या जाहीर केलेल्या कार्यकारिणीचा अधिकृतरित्या पदग्रहण व सत्कार समारंभ उरण तालुका कॉंग्रेस कमिटी तर्फे आयोजित करण्यात आला होता. रविवार दि ६ मार्च २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्ह्यातील मान्यवर, नेते मंडळी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अस्ट्रो मॅरेज हॉल, खोपटे, धसाखोशी पाड्याजवळ, खोपटे -उरण येथे मोठ्या उत्साहात पदग्रहण व सत्कार समारंभ संपन्न झाला.

सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सांगितले की, आपण सर्वांनी पदाचे महत्व ओळखून रात्रंदिवस पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न करावा. गोरगरिबांना न्याय द्यावा. पक्षाचा प्रसार व प्रचार करावा.सर्वांनी मेहनत घेतल्यास रायगड जिल्ह्यात कॉंग्रेस पक्ष येत्या काळात एक नंबरचा पक्ष होईल. असे महेंद्र घरत यांनी सांगितले. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा झेंडा फडकविण्यासाठी अहोरात्र मेहनत करून कॉंग्रेस पक्ष वाढवावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले व सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, उरण शहर अध्यक्ष प्रकाश पाटील यांचा पदग्रहण सोहळा यावेळी संपन्न झाला. रायगड जिल्ह्यात कॉंग्रेस पक्ष वाढीसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचाही सत्कार करण्यात आला. कॉंग्रेस पक्षाच्या डिजिटल मेंबरशीप अभियान अंतर्गत सदस्य नोंदणी बाबत प्रमुख मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी राज्य उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, रायगड जिल्हा जेष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा उपाध्यक्ष गणेश म्हात्रे, उपाध्यक्ष किरीट पाटील, जिल्हा सरचिटणीस नित्यानंद म्हात्रे, सरचिटणीस महेंद्र ठाकूर, सरचिटणीस जीवन गावंड, अखलाक शिलोत्री, तालुकाध्यक्ष रेखा घरत, उपाध्यक्ष निर्मला पाटील, वैभव पाटील, विवेक म्हात्रे, कृष्णा पाटील, श्यामकांत पाटील, समीर म्हात्रे, सुजीत म्हात्रे आदी कॉंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते.

# कृष्णा महाराज फाटे यांना रा. जि. प. रायगड भूषण पुरस्कार

**दै.रायगड नगरी । चौक**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या बहुचर्चित रायगड भूषण पुरस्काराचे वितरण आज अलिबाग येथील पी.एन.पी नाट्यगृहांमध्ये पालकमंत्री आदिती तटकरे, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, माजी आमदार पंडित पाटील, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यंदा जिल्ह्यातील २५७ जणांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून चौक कोपरी येथील अध्यात्माचा वारसा चालवणारे तसेच विभागात महशूर असणारे ह.भ.प. कृष्णा महाराज फाटे यांना रायगड जिल्हा परिषदेचा रायगडभूषण हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अलिबाग येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उत्तम प्रकारे कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला कृष्णा महाराज फाटे हे श्री क्षेत्र आळंदी पंढरपूर मराठा धर्मशाळा विश्वस्त असून त्यांनी समाजाला पारमार्थिक गोडी लागावी म्हणून समाजात ज्ञानाचे दान देण्याकरता यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या या कार्याची दखल रायगड जिल्हा परिषदेने घेतली आणि त्यांना या वर्षीचा पुरस्कार जाहीर झाला. रायगड भूषण पुरस्कार जाहीर होताच कोपरी गाव व आजूबाजूच्या गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले दरवर्षी होणारा हा सोहळा मागील दोन-तीन वर्षात झाला नाही.दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जावा. अशी चर्चा सर्वसामान्य जनतेत होत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## करोडो रुपयांचा कर बुडविल्या प्रकरणी आयओटीएल कंपनी विरोधात कारवाई

केला जाईल असे सिडको कडून दिनांक २ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रान्वये आय ओ टी एल कंपनीस कळविले आहे. मात्र अशा परिस्थिती मध्ये देखील कंपनीचा व्यवसाय सिडकोच्या मालकीच्या सुमारे सत्तावन्न एकर जमीनी वरती विना परवाना सिडकोच्या परवानगी शिवाय आज तागायत चालू आहे.

वरील प्रकरणा मूळे भोगवटा आणि सर्व्हिस चार्ज या संदर्भातील कंपनी कडे निघत असलेल्या करोडो रुपयांची सिडको ची थकबाकीची रक्कम वसूल करणे संदर्भात आणि अनधिकृत पणे सुमारे सत्तावन्न (५७) एकर सिडकोच्या मालकीच्या जमिनीमध्ये सिडको च्या परवानगी शिवाय विना परवाना व्यवसाय करत असल्या संदर्भात प्रकल्पग्रस्त यांनी गरजेपोटी बांधलेल्या अनधिकृत बांधकामा वरती डोजर फिरवून प्रकल्पग्रस्ताना बेघर करणारी सिडको आयओटीएल कंपनी विरोधात काय कारवाई करते या कडे सर्व प्रकल्प प्रकल्पग्रस्तांचे लक्ष लागून राहिले आहे.

## पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्वाचे : आ.प्रशांत ठाकूर

हा सर्व समाजासमोर होतो ही आनंदाची बाब आहे. महिलांचे कार्य उदात्त असते. असे सांगतानाच केदार भगत आणि मित्र परिवार नेहमीच समाजाप्रती कार्यरत असतात. महिलांचा सन्मान करून त्यांना प्रेरणा मिळावी हाच हा कार्यक्रम उद्देश आहे. त्यामुळे केदार भगत आणि मित्र परिवाराचे कौतुक यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्वत्र महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. पनवेलमध्येही असाच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजपचे युवा नेते केदार भगत यांच्या मित्र परिवाराच्यावतीने हळदी कुंकू सोबत गुरु कदम यांच्या चला जिंकूया पैठणी या खेळाचेही आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या. महिलांना नेहमी आकर्षित करणारी पैठणी या कार्यक्रमात विजेत्यांना बक्षिस म्हणून देण्यात आली. त्यामध्ये लकी ड्रॉ, ३ पैठणी साड्या, ५१ आकर्षक बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे उदघाटन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. तर पारितोषिक वितरण समारंभ वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, पूनम ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय या कार्यक्रमात २१ कर्तृत्वान महिलांचा यथोचित सन्मान देखील करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गीतांजली भगत, निकिता पाटील, सायली भगत, मंजिरी भगत, जिन्यासा भगत, प्रज्ञा भगत, योगिता डांगरे, प्रीती पाटील, प्रणाली बहिरा, अवंती गडगे, अंकिता बहिरा, सिमीन साळवी, अनिता गायकर, माधुरी अनिकेत सावंत, वैभवी वाघीलकर, पूनम पारचे, प्रचिती शेट्ये, श्रेया जाचक, ज्योत्सना दसवते, भक्ती शिंदे, अंजली अनभुले, प्रीती दसवते, भाविक शिंदे, संजीवनी वर्तले, अनिता ढगे, कांचन कदम, स्वप्नाली धनावडे, प्रतीक्षा दसवते, आरती घरत, अनिता मढवी, सुमित दसवते, संकेत दसवते, भावेश शिंदे, संतोष वर्तले, हर्षद गडगे, नितेश भगत, योगेश साळवी, अनिकेत सावंत, ब्रिजेश बहिरा, गौरव सावंत, साहिल मोरे, निखिल खैरे, श्रेयश शिंदे, रवी पारचे, सचिन जाचक, प्रथमेश धनावडे, जयदीप भगत, मंगेश भगत, मंदार भगत, सुबोध पाटील, चिन्मय भगत, निहाल म्हात्रे, सिद्धू मोरे, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील, सचिन भगत, जयेश भगत, कुमार भगत, मछिंद्र भगत, बाळकृष्ण भगत, नितीन पाटील, संतोष कथोरे यांनी विशेष प्रयत्न केले.

## जागतिक महिला दिन पनवेलमध्ये अनोख्या पद्धतीने साजरा

असल्यामुळे आम्ही या नाट्य प्रयोगाचा दुसरा प्रयोग एकाच दिवशी आयोजित केला. दोन्ही नाट्यप्रयोगाला हजारो महिलांनी उपस्थिती दाखवली. आपल्या पनवेलमधील महिला स्वच्छता दूत, मोची काम करणाऱ्या भगिनी, भाजी विकणाऱ्या मावशी, दूध विक्रेता ताई, माझ्या आबोली रिक्षा चालवणाऱ्या सर्व भगिनी, डॉक्टर, आर्किटेक्ट,पोलीस, स्वयंसेवी संस्था चालविणाऱ्या महिला पदाधिकारी अशा अनेक प्रकारच्या क्षेत्रात बिनधास्तपणे वावरत आपलं कर्तव्य बजावणाऱ्या या सर्वांनी उपस्थित राहून आजच्या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते श्री.प्रितमदादा म्हात्रे यांच्यातर्फे नाट्य प्रयोगाच्या निमित्ताने पनवेल मध्ये उपस्थित राहिलेल्या सर्व कलाकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना प्रीतम दादा यांनी सांगितले आमच्या विनंतीला मान देऊन आज पनवेलमधील सर्व क्षेत्रातील महिला येथे आल्या आहेत. हाच माझा महिलांच्या वतीने महिला दिनानिमित्त आम्हाला मिळालेला मोठा सन्मान आहे असे मी समजतो. यापुढेही कुठल्याही प्रकारचे सहकार्य लागल्यास माझी जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था आपल्या सोबत खंबीरपणे उभी राहील.

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्यावर भर : ना.अशोक चव्हाण

पनवेल ते इंदापूर या ८४ किलोमीटर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित येत असून यातील पनवेल ते वडखळ या ३८ किलोमीटरच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित विविध भागातील ८४ किलोमीटरपैकी ६३ किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

इंदापूर ते झराप या एकूण ३६६ किलोमीटर लांबीतील ३५५.२८० किमी रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून काम तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. रस्त्याचे काम करीत असताना बाधित होणाऱ्या जलवाहिन्यांचे स्थानांतरण करण्यात येते तसेच पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी या कामाचे देयक महाराष्ट्र जीवन प्राधिकणाकडून प्रमाणित केल्यानंतरच अदा केले जाते, असेही श्री.चव्हाण यांनी यावेळी सांगितले. या चर्चेत विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे आदींनी सहभाग घेतला.


# ग्रामपंचायत विचुंबे

**ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर सूचना २०२१/२२

दि.०८/०३/२०२२

ग्रामपंचायत विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रामपंचायत विचुंबे हद्दीतील पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | विचुंबे अंतर्गत पाईप लाईनवर वॉल बसविणे | ३०००००/- | ३०००/- | १६/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | १६/०३/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २ | विचुंबे हनुमान नगर पाईप लाईन टाकणे | २२३४१३/- | २२३४/- | १६/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | १६/०३/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ३ | गणेश भिंगारकर ते अनंत गावंड यांचे घरपर्यंत आार.सी.सी.पाईप गटर बांधणे | २५००००/- | २५००/- | १६/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | १६/०३/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ४ | सुंदराबाई घर ते प्राथमिक शाळेपर्यंत बंदिस्त गटर बांधणे | २५००००/- | २५००/- | १६/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | १६/०३/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.०८/०३/२०२२ ते १६/०३/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.०८/०३/२०२२ ते १६/०३/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.१६/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.१६/०३/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत विचुंबे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१४) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१५) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.
१६) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१७) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१८) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
२०) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
२१) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ३५ वे स्नेहसंमेलन आनंदात साजरे



**दै.रायगड नगरी । माथेरान**

शुक्रवार दिनांक ४/३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा द सेंट्रल रेल्वे तिकिट चेकिंग स्टाफ वेलफेअर ट्रस्ट मुंबई चे ३५वे वार्षिक स्नेहसंमेलन सी एस टी एम ऑडिटोरिम मध्ये मोठ्या आनंदात जल्लोषात कोविड बाबत नियमांचे पालन करत साजरा झाले.

सदर कार्यकारी रेल्वेचे मान्यवर रेल्वे अधिकारी गौरव झा, प्रकाश कानोजिया, डगलस मिनेझिस, व्ही एस मीणा, आर बी दीक्षित, दीपक शर्मा यांच्या उपस्थित १५ सेवानिवृत्त स्टाफचा सत्कार करण्यात आला. त्या मध्ये ट्रस्टचे ट्रस्टी आर आर तिवारी, तिकिट चेकिंग परिवारचे अध्यक्ष संजय आंग्रे तसेच त्यांच्या पत्नीचा ही सत्कार करण्यात आला. सन २०21 मधील दहावी/बारावी उत्तीर्ण विध्यार्थांचा गुणगौरव करण्यात आला. विनोद मोहिते, मुरली अय्यर, व महालक्ष्मी अय्यर यांचे मार्गदर्शन व सह कलाकार सोबत तिकिट चेकिंग स्टाफचा सुरझंकार हा गाण्यांचा कार्यक्रमने सर्वांचे अप्रतिम मनोरंजन केले.

ट्रस्टची स्मरणिका २०२२ चे प्रकाशन ही करण्यात आले ट्रस्टचे अध्यक्ष राणाप्रताप तिवारी, सचिव डी व्ही चिंदरकर, खजिनदार जी बी कदम, सहा सचिव हरिश मोंडकर, उपाध्यक्ष सुहास जोशी, ट्रस्टी शेखर तांबे, बाला पिल्लाई, लीना गोरडे यांची उत्तम कार्यक्रमाची आखणी नियोजन मुळेच सुंदर कार्यक्रम झाला.

## मानवता फाऊंडेशन ने निरोगी ज्ञानी बालपण मोहीम केली सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सक्षम भवितव्य घडवायचे असेल तर सक्षम पिढी घडवायला हवी, हे लक्ष समोर ठेवून मानवता फाऊंडेशन ने निरोगी ज्ञानी बालपण मोहीम सुरू केली आहे. याचा प्रारंभ चाफेवाडी व फणसवाडी या आदिवासी पाडापासून झाला. पी आय एल मुंबई प्रा. लिमिटेड यंदा ५५ वा वर्धापन दिन साजरा करत असल्याने त्या अनुषंगाने त्यांनी मान- वता फाऊंडेशनच्या मोहिमेला पाठबळ दिले व सामाजिक बांधिलकी जपण्याची आपली जवाबदारी उत्तमरित्या पार पडली. आदिवासी पाड्यावरील मुलांना अन्नदा पोषण पोटली, शैक्षणिक किट, ब्लॅंकेट्स आणि खावू चे वाटप करण्यात आले. यावेळी पी आय एल मुंबई प्रा. तर्फे तृप्ती कुंदर आणि टीम ने प्रत्यक्ष सहभाग घेतला. व मोहिमेत सहभागी झाल्याचे समाधान, आनंद व्यक्त केला आणि या पुढेही अश्या कार्यात आनंदाने सहकार्य करू अशी हमी मानवता फाऊंडेशन ला दिली.

आम्ही नेहमीच जनहितार्थ कार्यक्रम राबवत असतो आणि ही मोहीम आम्ही अशीच पुढे चालू ठेवू, असे संस्थापक अध्यक्ष संजय पवार यांनी सांगितले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जेष्ठ पत्रकार व्यंगचित्रकार रविंद्र कुवेसकर रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून, समाजासमोर आदर्श ठेवणाऱ्या व्यक्तींचा रायगड जिल्हा परिषदेतर्फे रायगड भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येत आहे. रायगड भूषण पुरस्कार अत्यंत मानाचा पुरस्कार असून, हा पुरस्कार भेटलेल्यांची जबाबदारी आणखी वाढली असल्याने त्यांनी यापुढे आणखी जोमाने काम करावे, अशी अपेक्षा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी दि. ६ मार्च रोजी अलिबागमध्ये रायगड भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रमात व्यक्त केली.



जिल्ह्यातील २६० जनांना रायगड भूषण सन २०२०-२०२१ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माणगांव उतेखोल येथिल जेष्ठ पत्रकार तथा व्यंगचित्रकार रविंद्र कुवेसकर यांना ही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व स्तरातील त्यांचे मित्र परिवाराकडुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गेली वीस वर्षाहुन अधिक काळापासून आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातुन तसेच सोशल माध्यमांवरील त्यांनी केलेले लिखाण जनमनाला भावले आहे.

दोन वर्ष महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष तसेच विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार क्षेत्रातही युनियन लिडर म्हणुन काम केले आहे कोमसाप शाखा माणगांवचे सदस्य रा- हीले आहेत, कोव्हिड कालावधी तही आपल्या लेखणीद्वारे जनजागृती केली आहे. विवीध सामाजिक समस्यावर पत्रकारितेच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकुन त्यातील अनेक समस्यांचा पाठपूरावा केला आहे. आज खऱ्या अर्थाने आपण करीत असलेल्या कामाला पोचपावती मिळाली व पुरस्काराला खरा चेहरा लाभला! असल्याच्या प्रतिक्रिया माणगांवातील अनेक मान्यवरांनी स्वतः कुवेसकर यांचेशी प्रत्यक्ष भेटून व मोबाईल वरुन संपर्क साधित व्यक्त केल्या आहेत. रायगड जिल्हा परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या रायगड भूषण पुरस्कारांचे वितरण पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रविवारी अलिबाग येथील पी.एन.पी. नाट्यगृहात शानदार कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी माजी मंत्री मीनाक्षी पाटील, आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार पंडित पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अर्थ व बांधकाम सभापती नीलिमा पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती गीता जाधव, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती बबन मनवे, विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, पनवेल नगरपालिका माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्यासह जिल्हा परिषदेतील सर्व पक्षांचे पक्षप्रतोद, जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये विधवा महिलांसाठी तिळगुळ समारंभ उत्साहात संपन्न



**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील आठ वर्षांपासून एक सेवाभावी उपक्रम आणि विधवा महिलांसाठी एक व्यासपीठ असावे जेणेकरून आपल्या सुखदुःखांची देवाणघेवाण करता येऊ शकते यासाठी सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शिंदे आणि रेखा चौधरी ह्या नेहमीच पुढाकार घेऊन विविध कार्यक्रमांचे राजकारण विरहीत आयोजन एक सामाजिक बांधिलकी म्हणून सर्व स्तरातील महिलांना सोबत घेऊन करीत आहेत.

समाजातील विषमता संपावी या उद्देशाने ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य केले त्यांचाच आदर्श ठेवत माथेरानच्या वर्षा शिंदे, रेखा चौधरी व त्यांच्या मैत्रीण मिळून गेल्या आठ वर्षा पासून विधवा महिलांसाठी तिळगुळ समारंभ आयोजित करीत असतात. महिलांना प्रत्येक क्षेत्रात, कार्यात तोच मानसन्मान मिळाला पाहिजे जो अन्य स्त्रियांना दिला जातो त्यामुळे महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत त्यांना देखील धार्मिक विधी कार्यक्रमात तोच सन्मान दिला पाहिजे असा संदेश समाजात दिला आहे.

पतीच्या निधनानंतर स्त्रियांवर अभाळ कोसळते संसाराचा गाडा कसा खेचायचा हे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते तर दुसरी कडे धार्मिक कार्यापासून दूर ठेवले जाते एखाद्या व्यक्तीचे निधन ही एक नैसर्गिक बाब दुर्दैवी स्त्रीला या गोष्टींचा फार मोठा आघात होत असतो. मुलुंड येथील पीस फाउंडेशन चे डॉ चारू शाह व योगेश शाह यांचे मित्र निकुंज गाडा, रिटा जैन, जतीन मारू, जलराम ब्युरो चे दावडा, अल्फा म्यांम यांनी साड्या व इतर भेट वस्तू वाण स्वरूपात दिल्या. सुप्रसिद्ध नृत्यांगना शरली संचेती यांच्या बहारदार नृत्याने कार्यक्रमाला सुरवात झाली. विविध मनोरंजनाचे खेळ आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुहासिनी शिंदे, अर्चना भिलारे, श्रद्धा रामाणे, निकिता देशमुख गिरीजा शिंदे, कल्याणी शिंदे, अर्चना बिरामने, रिजवाना शेख, वर्षा घाग यांनी विशेष मेहनत घेतली. भाजपच्या माजी नगरसेविका प्रियांका कदम, प्रतिभा घावरे, मराठा समाजाच्या महिला अध्यक्ष रजनी कदम, राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्ष स्वाती कुमार व उपाध्यक्ष स्नेहा चव्हाण, काँग्रेस महिला उपाध्यक्ष कामिनी शिंदे, चिटणीस सुहासिनी दाभेकर आदी उपस्थित होत्या.

## दोन रिक्षा चालकांवर हाणामारीचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चोळई येथील दोघा मावस भावामध्ये जमिनीच्या वादातून पोलादपूर शहरात एका भावाने दुसऱ्या भावाला दांडक्याने मारले. हे दोघेही मावसभाऊ रिक्षाचालक असून याप्रकरणी मारहाण करणाऱ्या मावसभावाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चोळईतील प्रदीप सिताराम कदम (वय-५०) आणि संजय मारूती कदम (वय-४०) या दोन रिक्षाचालक असून त्यांचे आपसात मावसभावाचे नाते आहे. त्यांचा जमिनीचा वाद असल्याने संजय कदम याने दि. ३ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पोलादपूर एस.टी.स्थानकामागील नंदाई मेडीकल स्टोअरसमोर त्याच्या रिक्षा क्रमांक एमएच ०६ झेड ३७०४ च्या प्रवासी बसण्याच्या जागेत ठेवलेला लाकडाचा दांडका घेऊन फिर्यादी प्रदीप कदम याच्या उजव्या पायाच्या पोटरीवर तसेच खांद्यावर जोरदार काठीने मारहाण केली.

याप्रकरणी गुन्हा र.नं. १०-२०२२ नुसार भा.दं.वि. ३२४, ५०४ कलमान्वये आरोपी संजय कदम याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार संदीप शिरगांवकर हे प्रभारी सहायक पोलीस निरिक्षक सुनील अवसरमल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

## महिलांनी राजकारणात आले पाहिजे : रेखा ठाकूर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

युनायटेड नेशन्स तर्फे प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या मानवी विकास अहवालात महिला विकासाच्या जागतिक क्रमवारीत २०१८ च्या अहवालात भारताचा क्रमांक १६७ देशात १५२ वा आहे म्हणजे या यादीत खालून १५ वा क्रमांक आहे. या क्रमवारीत प्रथम स्थानी कुवेत या अरब देशाचा आहे. भारतीय महिलांचे मागासलेपणा दाखवणारी ही आकडेवारी बहुसंख्य महिला शिक्षण, आरोग्य, स्वच्छता या मूलभूत नागरी सुविधांपासून आजही वंचित असल्याचे दर्शवते.

मूलभूत प्राथमिक सुविधांपासून मागास समूहातील स्त्रिया वंचित आहेत कारण त्या निर्णय प्रक्रियेपासून दूर आहेत व त्यामुळे त्यांचा देशाच्या साधनसामुग्रीतील न्याय्य हिस्सा त्यांना नाकारला जात आहे. हा हिस्सा राजकारणात आल्या शिवाय या महिलांना मिळणार नाही.

वंचित महिलांच्यावरील लैंगिक अत्याचाराची समस्याही गंभीर आहे. सामाजिक व लैंगिक अत्याचार व भेदभाव दूर करण्यासाठी देखील राजकीय सत्ता महत्त्वाची आहे. भारतीय महिला राजकारणा पासुन दूर आहेत कारण महिलांना सत्ता देऊ नये अशी मनुस्मृतीची व्यवस्था होती त्यापासून आजही समाजात बाहेर पडलेला नाही. महिलांना नाकारलेला राजकीय सहभाग मिळवून देण्याची वंचित बहुजन महिला आघाडीची भूमिका आहे व त्या साठी खासकरून दलित आदिवासी ओबीसी मुस्लीम महिलांना संघटित करून सत्तेत नेण्यासाठी आम्ही काम करत आ- होत. वंचित बहुजन आघाडी महिला प्रदेशाध्यक्ष या नात्याने महिलांचे संघटन सांभाळत आहे. तसेच सध्या वंचित बहुजन आघाडीची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा सांभाळत आहे. असे रेखा ठाकुर म्हणाल्या.

## गावठाण येथे क्रिकेट सामने मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील शिवछत्रपती महाराज क्रिकेट असो.च्या वतीने धामणसई विभागीय गावठाण येथे संपन्न झालेल्या क्रिकेट सामने मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

विभागातील मुलांच्या कलाकौशल्याला चालना मिळावी, शारिरीक क्षमता वाढावी तसेच अंगी खिलाडूव्रुत्ती यावी व नेतृत्वगुण वाढावे या उद्देशाने शिवछत्रपती महाराज क्रिकेट असो.च्या वतीने धामणसई विभागीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ठिकठिकाणी केले जात आहे. त्याच उद्देशाने शिवमुद्रा मित्र मंडळ गावठण यांच्या वतीने संपन्न झालेल्या भव्य क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन प्रसंगी गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष जयवंत मुंडे, कुणबी समाज युवक अध्यक्ष आनंद थिटे, युवा कार्यकर्ते महेश तुपकर, महेश बामुगडे, सूरज कचरे, गौरव सुर्वे, महेंद्र पार्टे, सागर फुलारे, रवींद्र देवरे, संतोष खेरटकर, बबन मोहिते, आदी मान्यवर उपस्थित होते.या स्पर्धेत विभागातील प्रत्येक गावातील क्रमांक क्रेट संघ सहभागी झाले होते. तर मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी नागरिकांनी उपस्थिती नोंदवून क्रिकेट स्पर्धेचा अस्वाद घेतला.

## आरोग्य शिबिरास उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

कमल हेल्थकेअर व समर्थ फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.अविनाश गोरड(B.H.M.S) यांनी गॅलॅक्सी अपार्टमेंट, सेक्टर ५३, अँपेक्स लँडमार्कच्या शेजारी, द्रोणागिरी नोड, उरण येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत नागरिकांचे मोफत रक्तगट तपासणी, साखर तपासणी, ऑक्सिजन तपासणी, उच्चरक्तदाब तपासणी, शरीराची तापमान तपासणी आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबिराचा नागरिकांनी, गरजूंनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. यावेळी शिवसेना द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर यांनी आरोग्य शिबिरास भेट देऊन शुभेच्छा दिल्या.यावेळी द्रोणागिरी शहर शिवसेना शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नारी सन्मान सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पेण बाफणा ज्वेल्स तर्फे पेण शहरातील गांधी मंदिर येथे मंगळवार ८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता पेणकर नारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजात ज्या महिला सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत अशा कर्तृत्ववान आणि यशस्वी महिलांना जागतिक महिला दिनानिमित्त सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषतः कोरोना काळात देवदूत म्हणून काम केलेल्या महिला डॉक्टर्स, नर्स, पोलिस अधिकारी, कर्मचारी, वकिल, बचत गटातील महिला यांचा समावेश आहे.


अॅड.निलेश द. हातमोडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.२७१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०४/२०२२

श्री.जगदीश नथुराम चौधरी
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत शिरढोण
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे आजोबा कै.पदू नामा चौधरी दि.०५/०२/१९७१ रोजी मु.पो. शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार श्री.जगदीश नथुराम चौधरी यांचे आजोबा कै.पदू नामा चौधरी यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जाच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०७/०३/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक प्रथमवर्ग न्याय.पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्याय.पनवेल**



राव साहेब

अर्जदारांतर्फे वकील
अॅड.के.बी.शिलवंते

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३०७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.मंजू देवी प्रकाश पुरी
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.मुकेश प्रकाश पुरी
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.अश्विन प्रकाश पुरी
वय : २३ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्रीम.पार्वती गोस्वामी
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.सरथूर, बडोद, पाली, राजस्थान — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे : खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कै.प्रकाश पुरी यांचे प्रत्यक्ष मालकीची व ताबेकब्जावहिटीतील मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी येथील दुकान नं.५, तळमजला, मारुती सदन गृहनिर्माण संस्था मर्या., कारपेट क्षेत्र १८१ चौ.फूट, प्लॉट नं.४३, सेक्टर १०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.प्रकाश पुरी यांचे दि.१२/०९/२०१५ रोजी सरथूर, बडोद, पाली, राजस्थान येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकती असल्यास अशा हरकतदाराने / नी आपली / ल्या लेखी हरकत / ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.७ माहे ०३ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**महाराष्ट्र शासन**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, ता.पेण, जि.रायगड**
**जाहिरात**

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या सर्वांगिण विकासा करणेसाठी अनुसूचित जमातीच्या कुडा मातीच्या घरात, झोपड्यामध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवारात राहतात किंवा बेघर असतात अशा लाभार्थ्यांकरिता स्नानगृह व शौचालयाच्या सुविधेसह पक्के घरकूल उलब्ध करून देणेकरिता पात्रताधारक लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच ज्या स्वयंसेवी संस्था घरकूल योजनेकरिता स्वयं योगदानासाठी तयार आहेत त्यांना कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर संस्थांमार्फत उपलब्ध झालेला निधीमधून लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**लाभार्थ्यांची पात्रता**
१) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.
२) लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.
३) लाभार्थ्यांकडे स्वतःची किंवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक राहील.
४) लाभार्थ्यांकडे स्वतःची किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे.
५) विधवा, परित्यक्त्या, निराधार, दुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** :
१) विहित नमुन्यातील अर्ज
२) नजिकच्या काळातील दोन रंगीत पासपोर्ट फोटो
३) असेसमेंट उताऱ्यावर पक्के घारकूल नसलेबाबत ग्रामसेवक यांचे लेखी प्रमाणपत्र
४) बेघर दाखला
५) जागा उपलब्धतेचा दाखला
६) ग्रामसभेचा ठराव
७) सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत
८) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला
९) आधारकार्ड
१०) रेशनकार्ड
११) राष्ट्रीयकृत बँक खाते

वरील प्रमाणे पात्र लाभार्थ्यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जि.रायगड या कार्यालयातून अर्ज घेवून जावेत व परिपूर्ण भरलेले अर्ज वर नमूद केलेल्या कागदपत्रासह या कार्यालयाकडे दिनांक १०/०३/२०२२ ते २१/०३/२०२२ पर्यंत सादर करावेत.

**सही/-**
**(शशिकला अहिरराव)**
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**पेण, जि.रायगड**

विमाका/कोवि/२०२१-२०२२/३४३

# संक्षिप्त...

## तळा ज्युनिअर कॉलेजमध्ये करिअर गाईडन्स शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

गो म वेदक विद्यामंदिर,ज्युनिअर काँलेज तळा येथे छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटी नवी मुंबई शेडुंग पनवेल मार्फत प्रोफेसर विश्वेश आंबेतकर व प्रोफेसर गिरीष कान्हेरे यांचे नितीन पाटील सर, विठ्ठल रेणूकर सर, यांनी स्वागत केले. ९ वी ते १२ विद्यार्थ्यांना १० वी १२ वी नंतर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे शैक्षणीक पात्रता असूनही योग्य निवड करता येत नाही.

विद्यार्थ्यांनी करिअर कसे घडवावे हा युनिव्हर्सिटी चा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणाच्या कोणत्या वाटा निवडाव्यात, शैक्षणीक पात्रते नुसार, इंजिनिअरिंग, वैद्यकीय क्षेत्र, बी एस सी प्रमाणे एम् एच् एम्,बि एच् एम्, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग, अशा अनेक शिक्षणासाठीच्या वाटा संबधी मार्गदर्शन करून १०नंतर डिप्लोमा कोर्सेस, फुड प्राँडक्शन, बेकरी, हाऊसकिपिंग,.फंन्ट आँफिस आँपरेशन तसेच १२ नंतर अधिक शिक्षण घ्यायचे असेल तरी या युनिव्हर्सिटीत जवळ पास ५०/६०कोर्सेस असून जर्नालिझम मास कम्युनिकेशन, लाँ,लायब्ररी सायन्स अशा खुप काही संधी उपलब्ध आहेत. हाँटेलींग व्यवसाय नोकरी, किंवा धंदा देखील करून परदेशात नोकरी देखील मिळू शकते असे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अरमन चंद्रकांत रोडे, सचिव मंगेश देशमुख ज्युनिअर काँलेज चेअरमन श्रीराम कजबजे पत्रकार आंबेगावे सर किशोर पितळे ढाकणे सर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलादपूर शहरामध्ये परिक्षेला गेलेली तरूणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

बारावीच्या परिक्षेचे पेपर घेऊन येणार असल्याचे सांगून महालगूर या गावातील घरातून गेलेली मुलगी परत घरी न आल्याने दोन दिवसानंतर मुलगी हरविल्याची तक्रार पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून पोलीस तपास वेगाने सुरू झाला आहे. तालुक्यातील महालगूर या गावातील एक १७ वर्षे ११ महिने वयाची मुलगी २ मार्च २०२२ रोजी पोलादपूर विद्यामंदिर येथे स्वत:चे लिहिलेले पेपर घेऊन जाते असे सांगून घरातून एका खासगी वाहनाने गेली. सदर तरूणी लहान वयाची असल्याचे माहिती असूनही पालकांच्या परवानगीशिवाय मुलीला अज्ञात इसमाने पळवून नेल्याची तक्रार तिच्या आईने पोलादपूर पोलीस ठाण्यात दि. ४ मार्च २०२२ पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल केली. यासंदर्भात गु.र.नं.११-२०२२ नुसार ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक फौजदार व्हि.डी.मिंडे हे प्रभारी सहायक पोलीस निरिक्षक सुनील बी.अवसरमल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# उरण नगर परिषदेतील कंत्राटी सफाई कामगार शासनाच्या सुविधांपासून वंचित

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण शहरातील उरण नगर परिषदे अनेक वर्षे कंत्राटी कामगार हे उरण नगर परिषदेत अनेक वर्षे कंत्राटी कामगार उरण शहरातील रस्ते, कचरा कुंड्या, कचरा गाडी बरोबर नागरिकांच्या घरातील कचरा विना हातमोजे, पायात गमबूट न घालता घाणीत हात घालून कचरा गाडीत कचरा भरण्याचे काम करत असल्याने कामगारांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या कामगारांच्या समस्या शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी म्युनिसिल एम्प्लाइज युनियनचे अध्यक्ष ॲड सुरेश ठाकूर यांनी अधिक माहिती देताना सांगितले की कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी अनेक वेळा पालिका प्रशासनाला लेखी पत्र व्यवहार कला धरणे आंदोलन केले. परंतु यांना पालिका प्रशासनाने आश्वासना खेरिज काही मिळाले नाही हे कंत्राटी कामगार



उरण नगर परिषदेत २००१ सालापासून ४ ते ५ हजार तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत.

या कामगारांना पालिका प्रशासनाने विविध सुविधा लागू करण्यात याव्यात यासाठी आम्ही उरण नगर पपरिषदेच्या मुख्य अधिकारी यांच्या कडे लेखी पत्र व्यवहार कला आहे परंतु त्यांनी आश्वासन दिले त्याची दखल घेतली नाही त्यामुळे कामगारात नाराजी आहे. उरण नगर परिषदेत सफाई कामगार हे बहुसंख्य कामगार हे झोपडपट्टीत राहतात दर सहा महिन्यांनी त्या कामगारांची आरोग्य तपासणी होणे हे गरजेचे आहे परंतु असे होत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली व पुढे म्हणाले की कंत्राटी सफाई कामगार हे उरण नगर परिषदेतील शहरातील गटारे, रस्ते, तसेच दर रविवारी उरण शहरात गावातील शहरात खरेदीसाठी येणाऱ्या नारिकांना हे विविध स्टॉलवर खाद्य पदार्थ विकणारे स्टॉलवाल्याचा वाढीव कचरा हेच कामगार कचरा उचलत असून कुंड्यातील कचरा गाडीत भरत असतात. कचरा गाडीतून बसून नगरिकांच्या घरातील कचरा घंटा गाडीतून विना हात मोजे भरण्यासाठी मेहनत घेऊन आपले शहर स्वच्छ करण्यासाठी परिश्रम घेत असतात.

या कामगारांना वेळेवर वेतन मिळावे व तसेच सेफ्टी म्हणून हातमोजे गमबूट शासकीय व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी कामगारांनी केली आहे असल्याची माहिती त्यांनी दिली.

## जागतिक महिला दिनी पनवेल तालुका पत्रकार महासंघ करणार

# कुष्ठरूग्णांना अन्नधान्य वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार तथा दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार तसेच ज्येष्ठ सल्लागार तथा दै.किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील आणि श्री भगवती साई संस्थानचे अध्यक्ष खेमचंद गोपलानी यांच्या नियोजनाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका पत्रकार महासंघ आणि श्री साई संस्थानच्या वतीने पनवेल येथील कुष्ठरुग्णांना अन्नधान्य वाटप कार्यक्रम हाती घेतला आहे.



सदर कार्यक्रम मंगळवार दि.८ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वाजता पनवेल येथील कुष्ठरुग्ण वसाहतीत आयोजित करण्यात आला असून तमाम नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील तसेच श्री भगवती साई संस्थानचे सचिव रामलाल चौधरी यांनी सांगितले.

# पत्रकार विश्वास निकम रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । कोलाड**

रोहा तालुक्यातील गोवे गा-वचे सुपुत्र पत्रकार विश्वास सख-ाराम निकम यांना रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा समजला जाणारा रायगड भूषण पुरस्कार राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री ना. अदितीताई तटकरे, रजिप अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, बांधकाम सभापती निलिमाताई पाटील आ.बाळाराम पाटील, माजी आ.पंडीतशेठ पाटील, मुख्याधिकारी डॉ किरण पाटील, यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.



विश्वास निकम यांनी सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला न्याय देण्याचा काम केले आहे. याशिवाय त्यांनी गावाकमेटीचे सचिव, उपाध्यक्ष, शालेय शिक्षण समितीवर अध्यक्ष, तसेच तंटामुक्ती समिती, ग्राम स्वछता अभियान, या कमेटीवर काम केले, त्याच बरोबर आदिवासी समाजाच्या जनहिताचे काम केले आहे. तर कोरोना काळात रायगड जिल्हा विविध संघटने मार्फत दिल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तू वाटप करण्यासाठी सुमारे ४० ते ४५ डोंगर दऱ्यातील वाड्या वस्त्यांवर जाऊन प्रत्यक्ष जाऊन काम केले आहे.

पत्रकार विश्वास निकम यांना या अगोदर २०१५ साली दै रायगडचा आवाजचा समाज भूषण पुरस्कार,२०२०-२१ चा आदिवासी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

तसेच विविध क्षेत्रातील असंख्य सन्मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले असून याची दखल रायगड जिल्हा परिषदेने घेत त्यांना मानाचा समाजाला जाणारा रायगड भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आला आहे. यावेळी रायगड भूषण पत्रकार डॉ. श्यामभाऊ लोखंडे, नंदू कळमकर, भिवा पवार, कोलाड रोहा लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य,पत्रकार मित्र, रोहा तालुका व खांब ग्रुप कुणबी विभाग, ऐनघर बेरोजगार संघटना, मित्र परिवार, गोवे ग्रामस्थ, तरुण वर्ग, महिला मंडळ, यांनी या पुरस्कारा बद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व सदिच्छा देत अधिक विविध क्षेत्रा-तून त्यांचतावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी अजिंक्य रोहेकर 'रायगड भूषण' पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल अजिंक्य बाळ-ाराम रोहेकर यांना रायगड जिल्हा परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



अलिबाग येथे झालेल्या समारंभात रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते त्यांना रायगड भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, सभापती निलीमा पाटील, तसेच अजिंक्य यांच्या आई व आरे बुद्रुकच्या केंद्रप्रमुख विद्या रोहेकर आणि कुटुंबीय, आदर्श शिक्षक ब्रिजेश भादेकर उपस्थित होते.

अजिंक्य रोहेकर पदवीधर असून त्यांनी आपली आई विद्या रोहेकर यांच्या समाजसेवेचा वारसा पुढे अखंडपणे सुरु ठेवला आहे. आईच्या पावलांवर पाऊल ठेवत त्यांनी विद्यालयीन शिक्षणापासून समाजसेवेत स्वतःला झोकून दिले.

सामाजिक क्षेत्रात त्यांनी विविध प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत एक चांगला पायंडा पाडला. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेने अजिंक्य रोहेकर यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन रायगड भूषण पुरस्काराने सन्मान केला. त्याबद्दल रोहेकर यांचे विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ग्रामविकास अधिकारी पदासाठी स्पर्धात्मक विभागीय परिक्षा १३ मार्च रोजी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोकण विभागातील जिल्हा परिषद सेवेतील ग्रामविकास अधिकाऱ्यांची पदे ग्रामसेवकातून निवडीने भरण्यासाठी विभागीयस्तरावरील मर्यादित स्पर्धात्मक परिक्षा-२०२१ दि.१३ मार्च २०२२ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषद सेवेतील ग्रामविकास अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी एकाच दिवशी परिक्षा घेण्यात येणार असून कोकण विभागातील परिक्षा के.आ.बांठिया माध्यमिक विद्यालय व एन.एन.पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालय, सेक्टर-१८, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल जि.रायगड या परिक्षा केंद्रावर होणार आहे.

अन्य विभागातील परिक्षार्थींनी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून आपआपल्या परिक्षा केंद्राबाबतची माहिती करून घ्यावी, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त तथा कोकण विभागाचे प्रधान परिक्षा समन्वयक विलास पाटील यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# इस्माईल भाई पल्लवकर रायगड भुषण पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणारा रायगड जिल्ह्यातील सर्वोच्च सन्मान म्हणजेच रायगड भूषण पुरस्कार वितरण सो-हळा ६ मार्च रोजी अलिबाग येथील पी एन पी नाट्यगृहात पार पडला. तळा तालुक्यातील रहाटाड गावचे ग्रामपंचायत माजी सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष, रायगड जिल्हा मुस्लिम वेल्फेअर आँर्गनायझेशन, पोलीस अधीक्षक रायगड, यांचेकडून देखील सामाजिक कार्यात व जातीय सलोखा राखण्यासाठी शासनाला सहकार्य केल्यामुळे सन्मान केला होता.व १९९२ साला पासून राजकीय क्षेत्रात योगदान दिले आहे.

राष्ट्रवादीचे निष्ठावंत कार्यकर्ते सामाजिक क्रिडा सांस्कृतिक कार्यात विविध ठिकाणी केलेल्या कार्याची दखल घेत इस्माईल भाई पल्लवकर यांना २०२०-२१ चा रायगड जिल्हापरिषदेचा अत्यंत मानाचा समजला जाणारा रायगड भुषण पुरस्कार पालक मंत्री मा.आदिती तटकरे हस्ते, मा.आ.पंडीत शेट पाटील, निलिमा पाटील, चित्राताई पाटील शिक्षक आम.बाळाराम पाटील रा.जि.प.अध्यक्षा योगीता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, जि.प सदस्या गीताताई जाधव कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थित सन्मान चिन्ह, शाल प्रशस्तीपत्र श्रीफळ, पुष्प-गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# नेरळ पोलिस ठाण्यात पाच घरफोड्यांची नोंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत घरफोड्याच्या संख्येत वाढ झाली आहे. नेरळ पोलीस ठाण्यात मागील दोन दिवसात घरफोडीच्या पाच घटनांची नोंद तक्ररदार यांनी केली आहे. त्या दृष्टीने नेरळ पोलीस ठाण्याकडून गुन्हे प्रकटीकरण पथक तैनात करण्यात आले असून घरफोडीच्या घटनेतील मास्टरमाइंडच्या शोधात नेरळ पोलीस आहेत.

नेरळ पोलीस ठाणे येथे मागील दोन दिवसात पाच घरफोड्या यांची नोंद करण्यात आली असून त्यात दोन घरफोड्या या कल्याण राज्यमार्गाच्या पलीकडे असलेल्या मोडकनगर येथील तर एक बाजारपेठ भागातील तसेच एक नेरळ पूर्व भागातील असून एक ममदापुरच्या नवीन वसाहत भागातील आहे. त्यात मोडकनगर येथील मधू अपार्टमेंटमध्ये झालेल्या चोरीच्या घटनेत ४४०० रुपयांचे चांदीचे दागिने लंपास करण्यात आले आहेत. तर त्याच भागातील श्री समर्थकृपा अपार्टमेन्ट मधील एका घरातुन २५६०० रूपांचे सोनायचे तसेच चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहेत. नेरळ टेपआळी भागातील दत्तकृपा रेसिडेन्सीमधील घरातून ३२९०० रुपयांचे सोन्याचे दागिने आणि चांदीचे दागिने चोरीला गेले आहेत.ममदापुर भागातील नवीन वसाहतीमधील डंकन अपार्टमेंटमधील बंद घरातून ६३,००० रुपयांचे दागिने चोरीला गेले आहेत. त्याचवेळी नेरळ पूर्व भागातील गंगानगर भागातील मातोश्री बंगला येथील घरातून ९००० रुपयांची रोकड पर्समधून काढून चोरट्यांनी पोबारा केला आहे.

या सर्व घटनांची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात झाली असून नेरळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनी त्या सर्व गुन्ह्यांचा तपास जलदगतीने व्हावा यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकाला सर्व अधिकार दिले आहेत. त्यामुळे दोन महिन्यात २० हुन अधिक चोरीच्या घटनांचा तपास गुन्हे प्रकटीकरण पथकाने ज्यापणाने लावला त्याप्रमाणे लागेल अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

# राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह दिनानिमित्त जिंदाल रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना आग विझविण्याचे प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील सुकेळी येथील जिंदाल रुग्णालयातील कर्मचा-यांना राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह दिनाच्या निमित्ताने शनिवार दि.५ मार्च २०२२ रोजी महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड कंपनीच्या अग्निशामक दलाच्या कर्मचा-यांनी आग विझविण्याचे प्रशिक्षण दिले. यावेळी जिंदाल रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाळ परमार, डॉ. इरम शेख, डॉ. सुयोग जवके, डॉ.प्रिया भोईर, रुग्णालयाचे व्यवस्थापक डॉ.जयरमण नडार व रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह दिन हा शनिवार दि.५ ते १० मार्च पर्यंत सर्वत्र राबविण्यात येणार आहे. या सुरक्षा सप्ताह दिनाच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड कंपनीच्या अग्निशामक दलाच्या कर्मचा-यांनी जिंदाल रुग्णालयातील कर्मचा-यांना अग्निशामकाच्या विविध साहित्यांबद्दल माहिती देत प्रशिक्षण दिले. यामध्ये कोणत्याही ठिकाणी आग लागल्यानंतर आग कशी आटोक्यात आणायची व सर्व साहित्य कशी हाताळायची याबाबतीत योग्य ते प्रशिक्षण देत त्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक जिंदाल रुग्णालयातील कर्मचा-यांकडुन करुन घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड कंपनीचे सेफ्टी मॅनेजर श्रीजीत, अग्निशामक दलाचे अधिकारी आशिशदास, प्रज्वल सकपाल, अंचिदानंद दास आदि अग्निशामक दलाचे कर्मचारी उपस्थित होते.

# कशेडी घाटाला पर्यायी भुयारी महामार्गाच्या कामातील बांधकाम साहित्याची चोरी उघड

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महाम ार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील बांधकाम साहित्याची चोरी होत असल्याचा दिवसेंदिवस पोटठेकेदार असलेल्या एसडीपीएल कंपनीला संशय आला असताना पोलादपूर पोलीस ठाण्यास दिलेल्या तक्रारीनुसार गुप्तवार्ता विभागाने काढलेल्या माहितीवरून गुरांच्या गोठ्यामध्ये चोरून आण-लेले स्टील अज्ञात आरोपीने लपवून ठेवल्याचे आढळून आले.

पोलादपूर शहरातील सैनिकनगर येथे सध्या वास्तव्यास असलेल्या प्रदीप तुकाराम चव्हाण (वय ३६, जळगांवरोड, ता.जि.औरंगाबाद) यांनी कशेडी घाटाला पर्यायी भुयारी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातून बांधकामाच्या साहित्याची सातत्याने चोरी होत असल्याची तक्रार पोलादपूर पोलीस ठाण्याला दिली होती. यामध्ये २५ मी.मी. जाडीचे बांधकामाच्या जुन्या वापरत्या स्टीलचे तुकडे अंदाजे २५० कि.ग्रॅ. वजनाचे किंमत अंदाजे १५ हजार रूपये आणि ३२ मी.मी. जाडीचे जुन्या वापरत्या स्टीलचे अंदाजे ३५० कि.ग्रॅ. वजनाचे तुकडे यामुळे हे बांधकाम साहित्य हस्तगत करण्याचे आव्हान पोलादपूर पोलीसांसमोर होते. यावेळी गुप्तवार्ता विभागाने या बांधकाम साहित्याच्या चोरीवर बारकाईने लक्ष ठेवले असता भुयारी महामार्गाचे काम सुरू असलेल्या भोगाव गावाच्या हद्दीत ४ मार्च रोजी सायंकाळी सात वाजल्यापासून ५ मार्च रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत एका गोठ्यामध्ये अंदाजे ३६ हजार रूपये किंमतीचे हा बांधकाम साहित्यातील जुने वापरते स्टिल हस्तगत केले.

यावेळी आरोपीचे नांव गांव अज्ञात असून याप्रकरणी पोलीस हवालदार चव्हाण हे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत. याप्रकरणी १३-२०२२ नुसार भा.दं. वि. ३७९ प्रमाणे अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.